नियमित फौ. ख. क्र. ३६/२०१९
सरकार -वि.- सुरेश शिंदे
नि.क्र. ४३.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.४ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - यशवंता नत्थू इरदंडे,
वय ६२ वर्षे, व्यवसाय – शेती,
राहणार – उकळी, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एस.मोरे यांचे मार्फत</u>**

१. मी आरोपींना ओळखते त्यापैकी एक आज कोर्टात हजर आहे. दि.०५.११.२०१८ रोजी पोलिसांनी मला समन्स दिला होता. आता मला दाखविलेला समन्स तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४४** देण्यात येते. पोलिसांनी माझ्या समक्ष कारवाई केली नव्हती. त्यावेळी मी शेतात जात असताना पोलीस घटनास्थळी लिखापडी करीत होते व त्यांनी माझी तिथे सही घेतली. आता मला दाखविलेला घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला आठवत नाही. सहीला **नि.क्र.४५** देण्यात येते. आता मला दाखविलेला जप्ती पत्रक तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला आठवत नाही.
सरतपास संपला.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.**
**उलट तपास - सरकार तर्फे**

२. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी मला मौजा सालेभट्टी शिवारातील रस्त्यावर पंचनामा करणेकरिता बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी तिथे मारहाण झालेल्या ठिकाणाचा घटनास्थळ पंचनामा तयार केला व एक लोखंडी पोकळ पाईप जप्त केला. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्या समक्ष घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला, मला वाचून दाखविला माझी सही घेतली. हे म्हणणे खरे आहे की, लक्ष्मण

मारुती देशकर याला पोलिसांनी पंचनाम्याच्यावेळी बोलाविले होते व त्याने माझ्या समक्ष सही केली. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी मला पंचनामा वाचून दाखविला. आता मला दाखविलेला घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तोच आहे. तोच आहे. त्यास **नि.क्र.४६** देण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी जप्ती पत्रक तयार केले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी जप्ती पत्रक मला वाचून दाखविला व माझी सही घेतली.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीची शेती सालेभट्टीला आहे. हे मला माहीत नाही की, पोलिसांनी आरोपीच्या शेताचा गट क्र.१३४/३० लिहीला व पंचनामा तयार केला. आरोपीची शेती रस्त्याला लागून आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या रस्त्याला लागून असलेल्या शेतीचा पंचनामा पोलिसांनी तयार केला होता.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,
स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.

दिनांक - ०९.०९.२०२५